# BOOK EXHIBITION
# 2019-20
# LIBRARY DEPARTMENT

पुण्य नगरी
मंगळवार, २५ फेब्रुवारी २०२० । कोल्हापूर-सांगली

## आष्ट्यात दुर्मिळ ग्रंथांचे प्रदर्शन

आष्टा / प्रतिनिधी

लोकनेते राजारामबापू पाटील जन्मशताब्दी वर्ष व कासेगाव शिक्षण संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून येथील आर्टस्, कॉमर्स कॉलेजमध्ये ग्रंथालय विभागाच्यावतीने दुर्मिळ ग्रंथांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

या प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य विलास काळे यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. बी. के. माने, प्रदीप पाटील, डॉ. राजाराम पाटील, प्रा. सुरेश दांडगे, प्रा. सर्जेराव गायकवाड उपस्थित होते. या प्रदर्शनात मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र अशा विविध विषयावरील ग्रंथांचा समावेश आहे. प्रदर्शनास डॉ. प्रतापसिंह मोहिते, प्रा. गणेश माने, प्रा. प्रमोद फार्णे यांच्यासह सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनींनी भेटी दिल्या. प्रदर्शनाचे आयोजन ग्रंथपाल दत्तात्रय शिंदे, जगन्नाथ मोरे, संजय पाटील, विक्रम खरात, असलम बावरी यांनी केले. ग्रंथालय परिचर अस्मल म्हाबरी यांनी आभार मानले.

दैनिक बातम्यांचा राजा
जनप्रवास
बुधवार, दि. २६ फेब्रुवारी २०२०

## आष्टा कॉलेजमध्ये ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन



आष्टा येथे ग्रंथ प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ.विलास काळे समवेत डॉ.बी.के. माने, प्रदीप पाटील, डॉ.राजाराम पाटील, प्रा.सुरेश दांडगे, प्रा.सर्जेराव गायकवाड...

इस्लामपूर • प्रतिनिधी

आष्टा येथील आर्टस् अँण्ड कॉमर्स कॉलेजमध्ये ग्रंथालय विभागाने आयोजित केलेल्या दुर्मिळ ग्रंथांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ.विलास काळे यांच्याहस्ते झाले. यावेळी डॉ.बी.के.माने, प्रदीप पाटील, डॉ.राजाराम पाटील, प्रा.सुरेश दांडगे, प्रा.सर्जेराव गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रदर्शनामध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, भूगोल, कॉमर्स, राज्यशास्त्र अशा विविध विषयांवरील महत्त्वाच्या ग्रंथांचा समावेश आहे. डॉ.प्रतापसिंह मोहिते, प्रा.गणेश माने, प्रा.विश्वास पाटील, प्रमोद फार्णे तसेच सर्व शिक्षक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थ्यांनी प्रदर्शनाला भेट दिली. ग्रंथपाल दत्तात्रय शिंदे, ग्रंथालय परिचर जगन्नाथ मोरे, संजय पाटील, अस्लम म्हाबरी, विक्रम खरात यांनी संयोजन केले. ग्रंथपाल दत्तात्रय शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. ग्रंथालय परिचर अस्लम म्हाबरी यांनी आभार मानले.

ARTS & COMMERCE COLLEGE ASHTA Dist. Sangli

PRINCIPAL
Art's & Com.College
ASHTA. Dist. Sangli